महाराष्ट्र शासन
# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
दूरध्वनी– ०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
E-Mail: ropune@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.ropune.org.in

जा. क्र. : तंशिविकापु/मा.अधिकार/विवि-३/२०२२/ 94
दिनांक : 06 JAN 2022

प्रति,
प्राचार्य / संचालक,
या कार्यालयाचे अधिनस्त सर्व शासकीय संस्था,
(पुणे विभाग पुणे)

**विषय : केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत सन २०२१ चा (०१ जानेवारी, २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१) सोळावा वार्षिक अहवाल सादर करण्याकरीता आवश्यक माहिती पाठविण्याबाबत**
संदर्भ : संचालनालयाचे, पत्र क्र.१६/आस्था/मा.अधिकार/२०२१/३७९ दि.३१/१२/२०२१

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, केंद्रिय माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम २५ अतंर्गत महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचा वार्षिक अहवाल दरवर्षी विधान मंडळास सादर करण्यात येतो. सन २०२१ चा (०१ जानेवारी, २०२१ ते ३१ डिसेंबर २०२१) सोळावा वार्षिक अहवाल सादर करण्याकरीता आपल्या संस्थेची माहिती, संस्थेच्या ई-मेल वरती पाठविण्यात आलेल्या विवरणपत्र १,२,२ब,२क,३,३क मध्ये भरण्यात यावी. तसेच आयोगाने दिलेल्या शास्तीबाबत व शिस्तभंगाच्या कार्यवाहीबाबतच्या प्रकरणांवर केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विवरणपत्र सोबत पाठविण्यात येत आहे. माहितीच्या अधिकारांतर्गत विहीत नमुन्यात सादर करण्यात आलेली माहिती अचूक असावी.

माहितीचे संकलन करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव व कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ही नमुद करण्यात यावा. तसेच मागील वर्षाच्या देण्यात आलेल्या माहितीशी सुसंगत असणे आवश्यक आहे.

सदर माहिती सादर करणे ही संविधानिक जबाबदारी असल्याने माहिती शासनास कालमर्यादेत सादर करणे बंधनकारक आहे. विहीत नमुन्यातील आपल्या संस्थेची संकलित माहिती दि.१४.०१.२०२२ पुर्वी GOOGLE SHEET मध्ये भरावी. GOOGLE SHEET संस्थेच्या ई-मेल वरती पाठविण्यात येत आहे. तसेच GOOGLE SHEET मध्ये भरलेल्या माहितीची प्रत आपल्या कार्यालय प्रमुखांच्या स्वाक्षरीने या कार्यालयास सादर करावी. सदरची माहिती विहीत मुदतीत सादर करावी, जेणेकरुन वरिष्ठ कार्यालयास विहीत मुदतीत सादर करणे शक्य होईल.

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :- १.मा.संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना माहितीस्तव
२.प्रोग्रमर,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता